पूर्वीच्या लोकांचा दृष्टिकोन व आतांचा दृष्टिकोन हयांच्यात खूपच फरक. दुस-या बाळंतपणाच्या वेळी इकडेच ये म्हणजे मुलगाच होईल आईने सांगितले होते मुलगाच झाला पम एव्हाना वडिलांना पॅरॅलेसिस झालेला. वकीली चालेना. आईनी बाळंतपण केले. जास्त दिवस राहाता येईना. लौकरच लहान दोन्ही बहीणीना घेऊन मी खांडव्यासाठी परतले. मुलीला सोय-यांकडे ठेवून शिकवायचे नाही हे वडिलांचे स्पष्ट मत. तिचे शिक्षण पीएचडी आहे असे हयांचे भविष्य. सध्या मुलगा लहान आहे मी घेऊन जाते असे सांगून आणले. तिच्याहून मोठ्या असलेल्या बहीणीला मुबंईला भावाकडे पाठविले. मी, हे मुली व पुष्पा (बहीण) मुंब्र्याला उतरलो व सुधा त्याच बसने माहीमला गेली. घोटाळ्यांची मालिकाच जणु माझ्या आयुष्यांत होती. बहीणीला माहिमला सोडून आले खरी पण तिचे पत्र येई पर्यंत तिची काळजी करणे एवढेंच माझ्या हाती होते. एक महिना झाला तिचे पत्र नाही. मग सविस्तर पत्र आले. माहीमलाच त्यांची बस खराब झाली. पण ड्रायव्हर वडिलांच्या परिचयाचा होता व कंडक्टर पण आमच्या घरी येत असे. शिवाय त्यांना भाऊ कुठे रहातो ते माहीत होते. भावाने रात्री फोन करून बस डेपोतून माहिती काढली होती. बस खराब झाली त्यामुळे माहिमलाच जवळच्या हॉटेल मध्यें थांबली आहोत सकाळी बस ठीक झाल्यावर निघतो तुमच्या बहीणीची उत्तम काळजी (सर्व पॅसेंजराची ) घेतली आहे. उद्या बस स्टॅंडवर या असे कंडक्टरने सांगितले. भावाचा जीव भांडयात पडला.

तिच्याहून मोठी प्रभा. तिच्यासाठी जिथे भावाने पत्रिका टाकली होती (दादरला) त्या मुलाचे आई वडील त्यावेळी घरात नव्हते. त्यांच्या बहीणीने सांगितले मंगळ आहे मुलाला. उद्या या. मुलीची पत्रिका मंगळी नाही पण लहान बहीणीला मंगळ आहे. तेव्हा मोठ्या बहीणीला विचारून त्याने निर्णय घेतला की उद्या मंगळी पत्रिकाच द्यायची. वडील बहीणीच्या लग्नाचे बघत नाहीत म्हणून माझ्याहून लहान भावाने मुंबईला नौकरी धरली. बोरिवलीत घर घेतले भाडयाने. बहीणीची लग्न झाल्याशिवाय मी लग्न करणार नाही असा निश्चय केलेला होता. आश्चर्य सुधाची पत्रिका जुळली. मुलगी पहिल्याच वेळी जिथे दाखवली तिथे पंसत पडली. लग्नाच्या सगळ्या गोष्टी वडीलाना व मोठया मेव्हण्यांना सागून त्या दोघाना मुलाकडे बोलणे करायला नेले. हुंडा जास्त म्हणून वडील उठून बाहेर आले. मेव्हणे पण नाराज. भाऊ म्हणाला मी लहान तोंडी मोठा घांस घेतेय कर्ज काढून सुध्दां मी हें लग्न जुळवणार व पार पाडणार. मुली साठी कुठे जोडे झिजवावे लागले नाहींत कुणाला विचारायची गरज पडली नाही. कुणाशीही सल्ला मसलत नाहीं. हे लग्न होणारच. वडील आधीच नाराज. ते व मेव्हणे निघून गेले. भावानें लग्न ठरविले नंतर मला सविस्तर पत्र पाटवून तूं लग्नाला येच असं आमंत्रण होतंच. पत्र वाचून माझी चिंता दूर झाली. एका बहिणीच्या ऋणातून तो मुक्त झाला. माझ्याकडे असलेल्या बहीणीला (पुष्पाला) मी लग्नाला पाठविलें. मी मात्र गेले नाही कारण दोन नंबरच्या मुलीचे  पायाचे ऑपरेशन त्याच दिवशी होते. भावानें नंतर पुष्पाला कॉलेजला घातले. त्याच्या पाठची माझी बहीण प्रभा आधीच बीए झाली होती व सेक्रेटरीएट मध्यें नौकरी करत होती. तिनें भावाला सांगितले होते जिचे लग्न जमते ते तिचे करून टाक. माझ्या साठी त्यांची वये वाढवूं नकोस. मी कुणावरही बोजा नाही. पैसे मिळविते शिक्षण आहे शिवण येते वगैरे. त्यानंतर धाकट्या बहिणीनें लव्हमॅरेज केले. अर्थात भावाच्या व वडीलची संमति होतीच. मोठी बहीण प्रभा पुन्हां भावाच्या मदतीला धांवली. तू आता लग्न कर तुला सांगून येताहेत. जी मुलगी पसंत पडेल तिच्याशी संसार कर आणि तो बोहल्यावर चढला. बरोबर त्याच्या लग्नाच्या आठव्या दिवशी प्रभाच्या (मुलगा पहाण्याचा) साठी स्थळ आले योगायोग मुलानें मुलगी पाहिली. लग्न ठरले झट मंगणी पट ब्याह अशीच अवस्था झाली.

मुलगी पहाण्यापासुन लग्न होई पर्यंत 6 ते 7 दिवस लागले. त्यावेळी मी दरभंग्याला होते. पत्र पोचायलाच 5, 6 दिवस लागायचे. म्हणून भावाने मला कांहींच कळविले नाही. मुलांना सुटी लागली की मुंबईला जात असें. मी गेल्यावर त्यानें मला ही सर्व माहिती दिली भावाचे लग्न झाल्यापासून लगेच तिच्यासाठीं चांगल्या स्थळांची माहिती मिळायला लागली त्यानें आधी तिचे लग्न उरकले व आपल्या ऋणातून पार पडला.